वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ,
परभणी

**२२ वा दीक्षांत समारंभ**
**जाहीर प्रकटीकरण**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचा २२ वा दीक्षांत समारंभ **दि. २६ डिसेंबर २०१८ रोजी सकाळी १०.००** वाजता विद्यापीठाच्या प्रांगणावर आयोजीत करण्यात आलेला आहे. मा. डॉ. अशोक ढवण, कुलगुरु, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी हे दीक्षांत समारंभाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. तसेच, मा. डॉ. त्रिलोचन महापात्र, महासंचालक, भारतीय कृषि शिक्षण व संशोधन परिषद, नवी दिल्ली हे दीक्षांत समारंभास उपस्थित राहून दीक्षांत अभिभाषण करणार आहेत. डॉ. विजय पांडुरंग भटकर, कुलपती, नालंदा विद्यापीठ, नालंदा, बिहार हे सदरील दीक्षांत समारंभास प्रमुख पाहूणे म्हणून उपस्थित राहाणार आहेत. सदरील दीक्षांत समारंभात शैक्षणिक वर्ष २०१६-१७ यामध्ये आचार्य पदवी, पदव्यूत्तर पदवी व पदवी परिक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना संबंधित पदवी अनुग्रहित करण्यात येणार आहे. सदरील दीक्षांत समारंभात पदवी अनुग्रहित करण्यात येणा-या विद्यार्थ्यांची यादी http://www.vnmkv.ac.in या विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तरी, शैक्षणिक वर्ष २०१६-१७ मध्ये उत्तीर्ण व विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेल्या स्नातकांच्या यादीत नांव समाविष्ट असलेल्या स्नातकांनीच दीक्षांत समारंभास उपस्थित राहावे.

विशेष सूचना :- दीक्षांत समारंभ वेळेवर सुरु होणार असल्यामुळे स्नातकांनी समारंभाच्या वेळेच्या एक तास अगोदर विव्दत दिंडीत सहभागी होण्यासाठी कार्यक्रम स्थळी यावे तसेच विद्यावस्त्रे दीक्षांत समांरभाच्या एक दिवस अगोदर किंवा दीक्षांत समारंभाच्या दिवशी सकाळी आठ च्या अगोदर संबंधित विद्याशाखेतून प्राप्त करावीत.

जाक्र :एएक्ससी-२२/डी-३(एच)
दिनांक : १२.१२.२०१८

12/12/18
कुलसचिव
12.12